परळी
# संघर्षनेता
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.
https://www.parlisangharshneta.in
9881265102 संपादक - मोहन व्हावळे
बीड | वर्ष- 11 वे | अंक क्र 88 | मंगळवार दि. 21 एप्रिल 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060



# परळीच्या शैक्षणिक क्षितिजावरचा दैदिप्यमान 'दीपक': 'बीडचे भूमिपुत्र' पुरस्काराचे मानकरी

# श्री. दीपकजी तांदळे साहेब

## यांना वाढदिवसाच्या कोटी कोटी शुभेच्छा!



परळी वैजनाथ (प्रतिनिधी):

नदीचा प्रवाह जसा भूमी सुजलाम-सुफलाम करतो, तसाच आपल्या कर्तृत्वाने आणि दातृत्वाने समाजमन समृद्ध करणारे व्यक्तिमत्व म्हणजे श्री पद्मावती शिक्षण संस्थेचे सचिव आदरणीय **श्री. दीपकजी तांदळे साहेब**. बीडच्या मातीशी नाळ जोडून सामाजिक बांधिलकी जपल्याबद्दल ज्यांना **'बीडचे भूमिपुत्र'** हा मानाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे, अशा ऋषितुल्य व्यक्तिमत्वाचा आज जन्मदिवस! या निमित्ताने संपूर्ण परळी आणि शैक्षणिक वर्तुळात उत्साहाचे वातावरण आहे.

मॅनेजमेंट गुरु म्हणून ओळखले जाणारे साहेब, **संस्कार शाळेच्या** प्रत्येक विटेत आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीत साहेबांच्या सूक्ष्म नियोजनाचा वाटा आहे. शाळेचे कामकाज पाहताना केवळ प्रशासक म्हणून नाही, तर विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणारे एक उत्तम 'शिल्पकार' म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या शिस्तबद्ध आणि दूरदृष्टीच्या नियोजनामुळेच 'संस्कार'ने आज शैक्षणिक क्षेत्रात एक वेगळा मैलाचा दगड प्रस्थापित केला आहे.

तांदळे साहेबांच्या स्वभावाचे वर्णन करायचे झाले तर 'नारळाची' उपमा अगदी सार्थ ठरते. शिस्तीच्या बाबतीत नारळाच्या करवंटीसारखे कठोर वाटणारे साहेब, अंतःकरणातून मात्र खोबऱ्यासारखे शुभ्र, मऊ आणि सर्वांना गोडवा देणारे आहेत. गरजूंच्या हाकेला धावून जाणारा त्यांचा हा प्रेमळ स्वभाव अनेकांसाठी आधारवड ठरला आहे.

पितृप्रेरणेतून शैक्षणिक क्रांतीचे स्वप्न साकारले .परळीत शैक्षणिक उत्क्रांती घडवण्याचे स्वप्न त्यांचे वडील कैलासवासी विठ्ठलरावजी तांदळे साहेब यांनी पाहिले होते. वडिलांचे हे अपूर्ण स्वप्न जिद्दीने पूर्णत्वास नेण्याचे महान कार्य दीपकजी तांदळे साहेब करत आहेत. या प्रवासात त्यांच्या आई श्रीमती प्रेमिलाताई तांदळे मॅडम, त्यांचे ज्येष्ठ बंधू श्री. कैलासजी तांदळे साहेब आणि बहीण माधुरीताई तांदळे मॅडम यांच्यासह समस्त तांदळे परिवार त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. कुटुंबाच्या या भक्कम पाठबळामुळेच साहेबांनी शैक्षणिक क्षेत्रात यशाची शिखरे पादाक्रांत केली आहेत.

केवळ शिक्षणच नव्हे, तर सामाजिक आणि आध्यात्मिक क्षेत्रातही त्यांचे योगदान शब्दातीत आहे. समाजातील पिचलेल्या आणि आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या घटकांना साहेबांनी नेहमीच गुप्तदान आणि प्रत्यक्ष मदतीचा हात दिला आहे. विविध देवस्थान आणि मंदिरांच्या जीर्णोद्धारासाठी वेळोवेळी सढळ हाताने मदत करून त्यांनी आपली धार्मिक श्रद्धा आणि सामाजिक कर्तव्य जोपासले आहे.

अतुलनीय नियोजन, दातृत्व, आणि कर्तृत्व या त्रिवेणी संगमाचे नाव म्हणजे दीपकजी तांदळे साहेब. या मंगल दिनाचे औचित्य साधून **श्री पद्मावती शिक्षण संस्था आणि संपूर्ण संस्कार परिवाराच्या वतीने** साहेबांना उदंड आयुष्याच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात येत आहेत. त्यांच्या या 'अतुल्य' प्रवासाला शुभेच्छा देण्यासाठी आज राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांची मांदियाळी जमली आहे.

*"तुमच्या कर्तृत्वाचा सूर्य असाच तळपत राहो आणि तुमच्या दातृत्वाची सावली समस्त गरजूंच्या आयुष्यात सुखद गारवा निर्माण करो,"* याच सदिच्छांसह दीपकजी तांदळे साहेब यांना वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा! प्रभू वैजनाथ आपल्या सर्व इच्छा पूर्ण करो हीच संस्कार परिवाराची मनोकामना!

# शिक्षणातून समाजपरिवर्तनाची वाटचाल- दीपक तांदळे यांचे प्रेरणादायी कार्य



एक काळ असा होता की शिक्षण विद्यार्थ्यांना खडतर प्रवास,पायपीट करणे,दळणवळणाची साधने नसणे, अत्यंत हलाखीच्या व गरिबीच्या परिस्थितीमध्ये जीवन जगून शिक्षण घेणे एकेकाळी फार अवघड होते. परंतु आजच्या कालखंडामध्ये आधुनिक दळणवळणाच्या साधनांमध्ये वाढ झाल्याने शैक्षणिक क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा शिरकाव झाल्याने शैक्षणिक क्षेत्रामध्ये प्रचंड प्रमाणामध्ये परिवर्तन झालेले आहे.पाटी पुस्तकाची जागा ही टॅबने, मोबाईलने,संगणकाने घेतलेली आहे.प्रत्यक्ष शिक्षक वर्गात शिक्षण देतात परंतु आता ऑनलाइन पद्धतीने विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याची सुविधा प्राप्त झालेली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर या जगामध्ये सध्या प्रत्येक क्षेत्रात अत्यंत वेगाने परिवर्तन प्रगती होत आहे ज्ञानाच्या कक्षा विस्तारत आहेत या जगामध्ये होणारे बदल प्रत्येक माणसाने स्वीकारुन त्या परिस्थितीनुसार चलण्याचे काम सुरु केलेलं आहे.पूर्वीच्या काळामध्ये शाळांचा दर्जा देखील अत्यंत हलाखीचा व अविकसित दर्जाचा होता.परंतु कालांतराने घेण्यासाठी अनेक शाळाचा दर्जा शालेय जीवन उंचावत गेले, त्याच्या कक्षा रुंदावत गेल्या ,प्रत्येक माणसाला शिक्षणाचं महत्त्व कळत गेलं आणि शिक्षण हे माणसाच्या जीवनाचं फार मोठे लक्ष आहे.हे प्रत्येक माणसाला कळू लागलेले प्रत्येक माणूस हा आज शिक्षण घेण्यासाठी आपल्या पाल्याला शिक्षण देण्यासाठी हाडाची काड रक्ताचे पाणी करून त्याला कितीही पैसा लागो त्या मुलाच्या शिक्षणासाठी स्वतःचा जीव धोक्यात घालून त्या मुलाला शिकवण्यासाठी प्रयत्नशील झालेला आहे.पूर्वस्त्रमी शिक्षण ही फार स्वस्त होते परंतु या आधुनिक युगामध्ये शिक्षण फार महागडे झालेले आहे सामान्य माणूस हा शिक्षण घेण्यापासून वंचित राहण्याचा अनेक वेळा प्रसंग येतो.परंतु परळी परिसरामध्ये आपल्या दूरदृष्टीतून शिक्षण क्षेत्रामध्ये परिवर्तनवादी चळवळीचे वारे निर्माण करुन परळी परिसरातील रंजल्या गांजलेल्या अत्यंत वाईट व बिकट परिस्थितीमध्ये जीवन जगणाऱ्या सर्वसामान्य गोरगरीब प्रत्येक जाती-धर्माच्या माणसाला शिक्षण घेता यावे यासाठी आपल्या अचाटकर्तुत्वाने हजारो विद्यार्थ्यांना आपल्या संस्थेच्या माध्यमातून आधुनिक पद्धतीचे व्यवस्थित शिक्षण मिळावे यासाठी संस्कार विद्यालयाच्या माध्यमातून परळी शहरांमध्ये एक क्रांतिकारी शैक्षणिक वाटचाल सुरु केलेली आहे. या संस्थेच्या उभारणीमध्ये अनेक खाचखळगे अनेक काटे कुपाटे बाजूला सारुनआपल्या परिश्रमातून कष्टातून या शाळेच्या जडणघडनिला आधार देणारे कैलासवासी.आदरणीय विठ्ठलराव तांदळेसर यांच्या विचारांना नतमस्तकहोऊन या शाळेचा वडिलांनी जो रचलेला पाया आहे.त्या पायाचा भक्कम असा कळस करण्याचे महत्त्वाचे कार्य करुन इंग्रजी माध्यमाच्या शाळा या शैक्षणिक क्षेत्रात प्रगती करु शकतात हा गोड गैरसमज दूर करुन मराठी शाळा देखील या शैक्षणिक क्षेत्रामध्ये स्वतःचा नावलौकिक करु शकतात हा विश्वास दाखवण्याचे काम आदरणीय दीपक तांदळे यांनी केलेला आहे .आपल्या वडिलांनी लावलेलं लहान स्वरुपचया रोपट्याच रुपांतर महाकाय अशा विशाल वृक्षांमध्ये विकसित करणारा, शैक्षणिक क्षेत्रामध्ये नाना प्रकारच्या विविध प्रकारच्या नवीन नवीन संकल्पना सर्वप्रथम आपल्या संस्थेमध्ये आणणारा, एक उपक्रमशील कर्तुत्ववान संस्था चालक म्हणून एका युवक कडे पाहिले जाते.त्या युवकाचे नाव आहे आदरणीय दीपक तांदळे परळी परिसरामध्ये अनेक नामांकित शिक्षण संस्था अस्तित्वात आहेत सर्वसामान्य माणसांना शिक्षण घेणे अत्यंत अवघड झालेले आहे या जगाचा काय पालट करायचा असेल प्रत्येक माणसाला आपल्या जीवनामध्ये काहीतरी साध्य करायचं असेल या नरकमय जीवनाचा अंत करायचा असेल काळोख्या जीवनामध्ये प्रकाश निर्माण करायचा असेल हजारो वर्षाची गरिबी दूर करायची असेल तुमच्या वाळवंटमय जीवनाला जर सुजलाम सुफलाम करायचा असेल तर त्यावर एकच पर्याय आहे.तो म्हणजे शिक्षण. परळी तालुक्यात होत नसेल असे स्नेहसंमेलन त्यांच्या शाळेमध्ये घेण्याचे काम अनेक वर्षापासून ते करत आलेले आहेत संस्कार विद्यालय हे खरोखरच परळीकरांच्या शैक्षणिक क्षेत्रामध्ये एक महिलाचा दगड निर्माण झालेला आहे या संस्कार विद्यालयाच्या माध्यमातून परळीतील अनेक गोरगरिबांची मुले ही शिक्षणाच्या माध्यमातून अनेक मोठ्या पदावर जाण्याचे काम करत आहेत या संस्कार विद्यालयाच्या जडणघडणीमध्ये तांदळे कुटुंबीयांनी घेतलेले परिश्रम आदरणीय विठ्ठल तांदळेसर यांनी आपल्या रक्ताचे पाणी करून हाडाची काड करून या संस्थेला वाढवण्यासाठी कित्येक वर्ष संघर्ष केला या संघर्षाला आज सामाजिक आर्थिक राजकीय क्षेत्रामध्ये फार मोठी मान्यता मिळाली आहे या संस्कार विद्यालयाच्या माध्यमातून आदरणीय दीपकतांदळे यांनी परळी परिसरातच नाही तर मराठवाड्यात या शिक्षण संस्थेचा नावालोकिक निर्माण केलेला आहे परळी परिसरामध्ये ज्या लोकांची ऐपत आपल्या लेकरांना शिकवण्याची नाही ज्या लेकरांना खरोखरच शिक्षणाची गरज आहे परंतु आर्थिक दृष्ट्या ते सबल नाहीत अशा अनेक गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेऊन या गोरगरिबांच्या कल्याणासाठी त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सदैव सतर्क असलेला शिक्षणाबरोबरच समाजाचे देखील आपल्याला काहीतरी देणं आहे या हुतात हेतूने प्रेरित होऊन अनेक गोरगरीब लोकांना नेहमीच सहकार्य करणारा आपल्या ओजस्वी वाणीने आपल्या विनम्र स्वभावाने प्रत्येक माणसाच्या मनावर अधिराज्य निर्माण करणारा दोस्तीच्या दुनियेतील करण्यासारखा दानशूर असलेला मानवी मूल्यांची जपणूक करत असताना कोणालाही हिंन न समजता प्रत्येक माणसाला माणुसकीने जगण्यासाठी त्या माणसाला नेहमीच आपुलकीचा लळा लावणारा परळी परिसरातील उच्च कोटीचा विचार मानवतावादी विचार प्रत्येक माणसाच्या घराघरांमध्ये पोहोचवण्याचं काम करणारा अत्यंत संयमी अत्यंत शांत स्वभावाचा असलेला या जीवनामध्ये येऊन आपल्या कर्तुत्वाने आपण मोठं झालं पाहिजे गोरगरिबांची सेवा केली पाहिजे आपलं जीवन सुखमय झालेला आहे तर लोकांच्याही जीवनाला सुखमय करण्यासाठी आपण हातभार लावला पाहिजे या जगामध्ये किड्या मखोड्यासारखे जीवन जगणाऱ्या असंख्य लोक आहेत अनेक लोक हे अंधाकारमय जीवन जगत आहेत ज्यांच्या जीवनाला काहीच अर्थ नाही अशी अनेक माणसे या जगामध्ये जीवन जगत आहेत अनेक अपंग माणसे अनेक असाही लोक या जगामध्ये जगत आहे प्रत्येक माणसाला जगण्याचा अधिकार आहे या लोकांच्या अंधाकारमय जीवनाला प्रकाशमय करण्यासाठी प्रत्येक माणसाने पुढ आलं पाहिजे येथील प्रत्येक माणसाची गरिबी दूर करण्यासाठी या समाजातील दानशूर माणसांनी या माणसांच्या सुखमय संसारासाठी हातभार लावला पाहिजे या मताचा असलेला प्रत्येक मानवाने मानवतावाद जोपासला पाहिजे रंजल्या गांजलेल्या अत्यंत हाला कीच्या व अवघडपरिस्थितीमध्ये जीवन जगणाऱ्या माणसाला आधार देण्यासाठी समाजातील अनेक लोकांनी पुढे आलं पाहिजे या विचारसरणीचा असलेला व स्वतः पुढे येऊन अनेक लोकांना मदत करणारा एक दानशूर व्यक्तिमत्व असलेला असंख्य लोकांच्या जीवनाला कराटने देणारा प्रत्येक माणसाच्या प्रत्येक मित्राच्या अडीअडचणीला धावत पळत जाऊन त्याला मदत करणारा जातीपातीच्या धर्माच्या भिंती ओलांडून त्या ठिकाणी मानवतावाद निर्माण करणारा माणुसकीचा झरा असलेला आपल्या वडिलांचा आदर्श आपल्या डोळ्यासमोर ठेवून आपल्या हृदयामध्ये आदरणीय विठ्ठलराव तांदळे यांचा वसा हाती घेऊन समाज परिवर्तनाच्या लढाईमध्ये येथील शिक्षण क्षेत्राच्या परिवर्तनाच्या लढाईमध्ये सक्रिय सहभाग नोंदवणारापरळी परिसरामध्ये अत्यंत प्रशस्त जागेतउपलब्ध असलेली प्रशस्त शाळा प्रत्येक सुखसोयीने समृद्ध असलेली शाळा आधुनिक शाळेसाठी आवश्यक असलेली सर्व साहित्य सामग्री ही संस्कार विद्यालय पद्मावती या ठिकाणी उपलब्ध करून आदरणीय दीपक भाऊ यांनी यांनीखरोखरच परळीकर व परिसरातील अनेक लोकांवर उपकारच केलेले आहेतआधुनिक पद्धतीचे शिक्षण प्रत्येक विद्यार्थ्याला मिळाला पाहिजे या विचाराने झपाटलेला आपल्या शाळेमध्ये आपल्या संस्थेमध्ये नेहमीच उपक्रमशील असलेला नाना प्रकारच्या शैक्षणिक सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून येथील विद्यार्थ्यांच्या मनामध्ये ध्येयवाद उत्पन्न करणारा प्रत्येक विद्यार्थ्याने स्पर्धात्मक परीक्षांमध्ये उतरले पाहिजे यासाठी स्पर्धात्मक परीक्षा लहानपणापासूनच या विद्यार्थ्यांना माहीत झाले पाहिजे येथील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रामध्ये मागे न राहता पुढेच गेले पाहिजे यासाठी प्रत्येक क्षेत्रा बाबतची माहितीविद्यार्थ्यांना असली पाहिजे म्हणून त्यांच्या संस्कार विद्यालयांमध्ये नाना प्रकारचे उपक्रम विज्ञानाच्या कसोटीवर आधारलेले प्रत्येक कार्यक्रम ते नियमितपणे राबवत आलेले आहेतखरोखरच अत्यंत कुशाग्र बुद्धी असलेला,कल्पक बुद्धी असलेला,समाजाच्या भल्यासाठी समाजाच्या उन्नतीसाठी समाजाच्या हितासाठी आपण काहीतरी केलं पाहिजे. या समाजाच्या कल्याणासाठी अनेक लोकांनी आपलं जीवन बरबाद केलेला आहे. अनेक लोकांनी समाजासाठी स्वतःचे बलिदान दिलेला आहे.या समाजाच्या परिवर्तनासाठी शैक्षणिक क्षेत्रातील तळागाळातील लोकांना वर आणण्यासाठी आदरणीय दीपक भाऊ तांदळे यांनी केलेले कार्य परळीच्या इतिहासात अतुलनीय असे कार्य आहे.या संस्थेचा नावलौकिक असाच पुढे -पुढे होत जावो.आदरणीय दीपक भाऊ तांदळे यांच्या या संस्कार विद्यालयाच्या माध्यमातून जागतिक पातळीवर नेतृत्व निर्माण करणारीविद्यार्थी निर्माणहोत आहेत.संस्थेत गोरगरिबांची लेकरे शिकत आहेत.त्या लेकरांनी आपले आई-वडिलांचे आपल्या शिक्षण संस्थेचे नाव उज्वल करावं,यासाठी आदरणीय दीपक भाऊ तांदळे यांनी त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या प्रत्येक अडी-अडचणीवर मात करण्यासाठी अनेक योजना सुरु केलेले आहेत भविष्यामध्ये या संस्थेत च्या माध्यमातून समाजाला साथ देणारी समाजाच्या विकासासाठी लढणारी असंख्य विद्यार्थी असंख्य अधिकारी निर्माण होत आहेत.हीच आदरणीय दीपक भाऊ तांदळे यांच्या वाढदिवसानिमित्त अपेक्षा.आदरणीय,दीपक भाऊ तांदळे यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त कोटी कोटी हार्दिक शुभेच्छा. या संस्कार विद्यालयाचा प्रत्येक विद्यार्थी हा समाजाच्या जडणघडणीचा मोठा खांब झाला पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याने सामाजिक आर्थिक राजकीय संस्कृत क्षेत्रामध्ये स्वतःचं नाव उज्वल केलं पाहिजे. संस्कार विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी समाज परिवर्तनाच्या लढाईमध्ये सक्रिय सहभाग घेऊन या विद्यालयाचे नाव पुढे नेलं पाहिजे हीच अपेक्षा जय भीम जय प्रबुद्ध भारत.



**-ॲड. दिलीप उजगरे**
**परळी वै.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

# शासनाच्या योजना तळागाळातील नागरिकापर्यंत पोहचवणाऱ्या संगणकपरिचालकांचा प्रश्न मुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीसानी सोडवावा – सिद्धेश्वर मुंडे

## आदिवासी रेला नृत्याने केले स्वागत ; गडचिरोली येथे जिल्हा स्तरीय मेळावा उत्साहात संपन्न !



गडचिरोली(प्रतिनिधी)गडचिरोली जिल्हा संगणकपरिचालक संघटनेच्या वतीने गडचिरोली येथे जिल्हा स्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते,यावेळी मागील सुमारे 15 वर्षापासून ग्रामपंचायत संगणकपरिचालक अतिशय तुटपुंज्या मानधन असताना सुद्धा शासनाच्या सर्व योजना गाव,वाडी,वस्ती,तांडा व पाड्यावर राहणाऱ्या सर्व सामान्य नागरिका पर्यंत पोहचवण्याचे काम प्रमाणिकपणे करत असून या संगणकपरिचालकांचा प्रश्न राज्याचे मुख्यमंत्री तथा गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी सोडवून सर्व संगणकपरिचालकांना न्याय देण्याची मागणी महाराष्ट्र राज्य संगणकपरिचालक संघटनेचे राज्यअध्यक्ष सिद्धेश्वर मुंडे यांनी मेळाव्यातून केली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त कि,महाराष्ट्र राज्य संगणकपरिचालक संघटना जिल्हा गडचिरोली च्या वतीने संस्कृती सभागृह गडचिरोली येथे संगणकपरिचालकांचा जिल्हास्तरीय मेळावा उत्साहात संपन्न झाला या मेळाव्यास प्रमुख मार्गदर्शक म्हणून संघटनेचे राज्यअध्यक्ष सिद्धेश्वर मुंडे,कार्यक्रमाचे अध्यक्ष संघटनेचे राज्यउपाध्यक्ष







मुकेश नामेवार,विशेष अतिथी म्हणून राज्य सचिव मयूर कांबळे,पंचायत समिती गडचिरोलीचे मा.सभापती मारोतराव इचोडकर,सामाजिक कार्यकर्ते मा.मोहन ठाकरे,राज्य संघटक संतोष कुडले,राज्य तांत्रिक प्रमुख ज्ञानेश्वर सूर्यवंशी,राज्य सहसचिव मारोती चंद्रवंशी,राज्यप्रसिद्धी प्रमुख संग्राम डिकळे,गडचिरोलीचे जिल्हाध्यक्ष संदीप बुरमवार,लाखनी पंचायत समितीच्या अश्विनीताई मोहतुरे,भंडारा जिल्हाउपाध्यक्ष रूपवसंत मोहतुरे हे व्यासपिठावर उपस्थित होते,अपघातामध्ये दुःखद निधन झालेल्या गौतम निमसटकर व वैशाली निमसटकर यांना श्रद्धांजली अर्पण केली,यावेळी बोलताना संघटनेचे राज्यअध्यक्ष सिद्धेश्वर मुंडे म्हणाले कि मागील सुमारे 14 वर्षापासून ग्रामपंचायत स्तरावर काम करणाऱ्या संगणकपरिचालकांना कर्मचारी दर्जा व किमान वेतन देऊन न्याय द्यावा यासाठी अनेक वेळा आंदोलने केली शासना समोर प्रश्न मांडला परंतु आश्वासना शिवाय शासनाकडून काहीही मिळाले नाही,गडचिरोली सारख्या दुर्गम भागातील सर्व सामान्य नागरिकांपर्यंत शासनाच्या सर्व योजना पोहचवण्याचे काम हेच संगणकपरिचालक करत असून,राज्याचे मुख्यमंत्री तथा गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी या प्रश्नात लक्ष घालून संगणकपरिचालकांना न्याय मिळवून द्यावा तसेच प्रधान सचिवांचे ऐकून ग्रामविकासमंत्री ना.जयकुमारजी गोरे यांनी संगणकपरिचालकांना 50 हजार रुपये मासिक वेगळा मोबदला मिळतो असे वक्तव्य विधानपरिषदेत केले असून त्यांनी तसा एक तरी संगणकपरिचालक दाखवण्याचे आवाहन यावेळी केले आहे,यावेळी राज्य सचिव मयूर कांबळे,राज्यउपाध्यक्ष मुकेश नामेवार,राज्य संघटक संतोष कुडले,राज्य तांत्रिक प्रमुख ज्ञानेश्वर सूर्यवंशी,जिल्हाध्यक्ष संदीप बुरमवार,पंचायत समिती सभापती अश्विनी मोहतुरे,मारोतराव इचोडकर,सामजिक कार्यकर्ते मोहन ठाकरे यांनी मनोगत व्यक्त केले,या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकेश उंदीरवाडे यांनी तर आभार प्रदर्शन राधेशाम भावने यांनी केले,या कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील संगणकपरिचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## घाटनांदुर येथे जगत ज्योती महात्मा बसेश्वर यांची जयंती वृक्षारोपण करून साजरी



घाटनांदुर प्रतिनिधी : – येथे जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त दिनांक 19 एप्रिल रविवार रोजी महात्मा बसवेश्वर चौक या ठिकाणी जगत ज्योती महात्मा बसेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन पुष्पहार अर्पण करून श्रीफळ फोडून अभिवादन करून वृक्षारोपण करण्यात आले यावेळी सरपंच महेश आप्पा गारठे, मा. जि प सदस्य दत्ता काका जाधव, गणेश भैय्या देशमुख, दादा वैद्य, धनंजय महाजन, पत्रकार परमेश्वर वैद्य, गजानन साखरे, शिवलिंग महाजन, आकाश महाजन, सुरज शेटे, मेहबूब शेख, गणेश नाईक, लक्ष्मण नाईक, राम जाधव, सर्वलिंग नाईक , देवेंद्र चव्हाण ,उमाकांत मुरुडकर, ऋषीकेश चौधरी, महेश मुरुडकर, ऋषिकेश साखरे व सर्व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हेल्मेट नसेल तर कारवाईच..! : पोलीस निरीक्षकाने चक्क आपल्याच ट्रॅफिक हवालदाराला दंड ठोठावला

## » शासकीय व निमशासकीय कर्मचारी सुद्धा हेल्मेट वापर करीत नसल्याने कारवाईचा बडगा



केज : दुचाकीवर प्रवास करताना स्वतःच्या सुरक्षेसाठी हेल्मेट वापरणे अत्यंत गरजेचे आहे. अनेक शासकीय व निमशासकीय कर्मचारी सुद्धा हेल्मेट वापर करीत नसल्याने केज पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक उनवणे यांनी वाहतूक शाखेचे पोलिस हवालदार यांना एक हजाराचा दंड ठोठावला.

रस्ते अपघातात दुचाकी स्वारांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन मोठ्या प्रमाणात मृत्यू होत असल्याने दुचाकी स्वार आणि पाठीमागे बसलेला या दोघानीही हेल्मेट घालणें अनिवार्य आहे. त्या संदर्भात त्याची अंमलबजावणी सुरु आहे.

सोमवारी (दि. 20) सकाळी 11 वाजण्याच्या सुमारास केज पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे हे पोलिस ठाण्याच्या आवारात असताना त्याच वेळी वाहतूक शाखेचे हवालदार हे विना हेल्मेटचे मोटार सायकलवर येत असल्याचे दिसताच स्वामील उणवणे यांनी त्यांना एक हजारा चा ऑनलाईन दंड देऊन त्याचे ई चालान फाडले.

भारतात रस्ते अपघातांचे प्रमाण अत्यंत चिंताजनक असून, हेल्मेट न वापरणे हे दुचाकीस्वारांच्या मृत्यूचे प्रमुख कारण बनले आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या आकडेवारी नुसार, दरवर्षी 50,000 हून अधिक दुचाकीस्वारांचा जीव जातो, ज्यामध्ये बहुतेकजण हेल्मेट वापरत नाहीत.

पान 1 वरुन

पान 4 वरुन

जातो.संपूर्ण शाळा सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीत असून, आधुनिक भौतिक सोयीसुविधांनी सज्ज आहे.

“आमच्यासाठी विद्यार्थी हाच केंद्रबिंदू आहे. योग्य नियोजन आणि त्यावर प्रामाणिक कृती केली की यश नक्कीच मिळते,” अशी भावना मॅनेजमेंट गुरु दीपक तांदळे यांनी व्यक्त केली आहे.

या यशाच्या प्रवासात पद्मावती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. कैलासजी तांदळे यांचे मार्गदर्शन आणि सह-सचिव श्रीमती प्रेमिलाताई तांदळे यांचे मायेचे छत्र लाभले आहे. मुख्याध्यापिका सौ. माधुरीताई तांदळे यांनी शाळेला शिस्त आणि गुणवत्तेचा नवा आयाम मिळवून दिला आहे. दीपक साहेबांच्या संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी अनकाडे सर यांचे अचूक प्रशासन,प्रभारी मुख्याध्यापक अमरशील गायकवाड सर,यांची शैक्षणिक पकड, पर्यवेक्षक इंगळे सर व देठणकर सर यांची चोख देखरेख तसेच शाळेतील सर्व समर्पित शिक्षक ,शिक्षिका आणि कर्मचारी वृंद या सर्वांचे टीम वर्क यशाचा खरा आधारस्तंभ आहे.

याप्रसंगी आपली भावना व्यक्त करताना दीपक तांदळे म्हणाले की, ‘प्रवेश पूर्ण’ हा शब्द केवळ जागा भरल्याचे प्रतीक नसून, पालकांनी आमच्यावर सोपवलेली मोठी जबाबदारी आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक तंत्रज्ञान आणि सुरक्षित वातावरण यांच्या संगमातून आम्ही विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडविण्यास कटिबद्ध आहोत. परळी तालुक्यातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण देत संस्कारक्षम पिढी घडविण्याचा आमचा संकल्प आहे.”

एकूणच, संस्कार प्राथमिक शाळेवर लागलेला *‘प्रवेश पूर्ण*’चा बोर्ड हा नवी उंची गाठण्याची प्रेरणा देणारा आहे. परळीतील शैक्षणिक वर्तुळात या यशाची मोठी चर्चा असून, शाळेने गुणवत्तेच्या जोरावर पुन्हा एकदा *’नंबर वन’* असल्याचे सिद्ध केले आहे.

---------------------------------------

सुर्वेश्वर सेवाभावी, शिवकन्या, शनेश्वर आदी महिला भजनी मंडळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

जयंतीदिनी दुपारी जन्मोत्सव सोहळा पार पडला. यावेळी परळीच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनीही शोभायात्रेस भेट देऊन आयोजकांचे अभिनंदन केले.यावेळी त्यांच्या समवेत माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, माजी उपनगराध्यक्ष सुरेशआण्णा टाक उपस्थित होते.

उत्सवातील मुख्य आकर्षण ठरली ती परळी शहरातून काढण्यात आलेली भव्य व देखणी शोभायात्रा. विशेष म्हणजे कर्णकर्कश ध्वनी टाळून पारंपरिक पद्धतीने शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी सोलापूर येथील प्रसिद्ध वीरभद्र पुरवंत संघ यांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या तलवारबाजी, पारंपरिक नृत्य, वेशभूषा व वाद्य सादरीकरणाने उपस्थितांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. महिला भजनी मंडळांचा सहभागही शोभायात्रेत उठून दिसला. एकसारख्या रंगाच्या साड्या परिधान करून ‘पाऊले’ खेळणाऱ्या महिलांनी शोभायात्रेला विशेष आकर्षण प्राप्त करून दिले.

ही शोभायात्रा कल्याणकारी हनुमान मंदिर येथून सुरु होऊन माणिकनगर हनुमान चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, नाथ चित्र मंदिर, हिंगलाज माता चौक (दोस्ती टी हाऊस) मार्गे वडार कॉलनीपर्यंत जाऊन पुन्हा मंदिरात येऊन समारोप करण्यात आला. मार्गावरील नागरिकांनी ठिकठिकाणी रांगोळ्या काढून व पुष्पवृष्टी करून शोभायात्रेचे स्वागत केले. तसेच पिण्याचे पाणी, चहापान व सरबताची व्यवस्था विविध दानशूर व्यक्तींनी केली होती.शोभायात्रा पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा मोठी गर्दी झाली होती. सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत उत्सवाची शोभा वाढवली. कार्यक्रमादरम्यान शहर पोलीस स्टेशन, परळी यांच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

या उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी युवराज गणपत आप्पा काळे, वीरभद्र विश्वनाथ आप्पा काळे,राजाभाऊ शिवाप्पा शेटे, वीरभद्र मारुती जवादे, सुरेश तुकाराम बेल्हाळे, आदर्श शिक्षक अशोक नावंदे सर, रमेश सदाशिव आप्पा काळे, सतीश विठ्ठल भुमकर, सतीश किलचे सर, बाळू शेटे, महेश शिंदे ,वैजनाथ कापसे ,विवेकानंद राघू यांच्यासह वीरशैव लिंगायत समाज बांधव, कल्याणकारी हनुमान मंदिर ट्रस्ट तसेच न्यू माणिकनगर परिसरातील सर्व नागरिकांनी विशेष परिश्रम घेतले.

----------------------------------

गावाला अंबाजोगाई आणि परळी या दोन्ही तालुक्याला जोडणाऱ्या राज्य महामार्गाची अतिवृष्टीमुळे चाळणी होऊन या मार्गावरील पूल देखील खचले गेले आहेत. आरोग्य, शिक्षण, व्यापार आदी विविध कारणाने या मार्गावरुन हजारो नागरिकांची वर्दळ असताना जीव मुठीत घेऊन या मार्गावर प्रवास करावा लागत आहे.

कार्य आदेश पारित होऊन देखील काम झाले नसल्याने या मार्गावरील युवकांनी बेमुदत ठिय्या आंदोलन करण्याचा पावित्रा घेतला. राज्य मार्ग 211 व राज्य मार्ग 486 या दोन्ही मार्गाला जोडणाऱ्या छत्रपती संभाजी महाराज चौक म्हतारगाव फाटा कांनापूर ता-धारूर या ठिकाणी रखरखत्या उन्हात गुरुवार दि 16 पासून बेमुदत ठिय्या आंदोलन सुरु केले. या आंदोलनाची दखल घेत उपअभियंता मुंडे, परळीचे तहसीलदार विनोद रणवरे यांनी भेटी दिल्या मात्र ठोस आश्वासन दिले नसल्याने आंदोलन सुरूच राहिले. या आंदोलनासाठी या राज्य मार्गामुळे वाघाळा, नागापूर, मांडेखेल, बोधेगाव, म्हतारगाव, कांनापूर, मोहा, वंजारवाडी, सरफराजपूर, गर्देवाडी आदी बाधित गावकऱ्यांनी रस्त्यावर एकत्र येत टायर जाळून प्रशासनाचा निषेध व्यक्त केला. दरम्यान आंदोलनाची व्याप्ती पाहता विभागाचे कार्यकारी अभियंता स्वामी, उपअभियंता मुंडे यांनी भेट देऊन सिरसाळा-मोहा रस्त्याची 8 दिवसात प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात येईल व परळी-नागापूर मार्ग नुतनीकरण निविदा पुनरप्रकाशीत करण्यात येईल असे लेखी आश्वासन दिल्याने हे आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले. या भेटी दरम्यान ॲड.अजय बुरांडे, मुरलीधर नागरगोजे, सुदाम शिंदे, भागवत देशमुख, विशाल देशमुख, प्रवीण देशमुख, विष्णुपंत देशमुख, विजय घुगे, सिद्राम सोळंके, प्रशांत मस्के, इस्माईल शेख, सुशील देशमुख, करेवाडीचे सरपंच लक्ष्मण कावळे, कांनापूरचे सरपंच गोपाळ कुकडे, कावळेवाडीचे सरपंच जगन्नाथ कावळे यांच्यासह परिसरातील गावातील शेकडो युवक, नागरिक उपस्थित होते.

--------------------------------

योजनेच्या 2.0 टप्प्यात धनंजय मुंडे साहेब यांच्या हस्ते सुमारे 100 लाभार्थ्यांना धनादेश (चेक) वाटप करण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात अनेक पात्र नागरिकांना अद्याप घरकुलाचा लाभ मिळालेला नसल्याचे वास्तव समोर येत आहे. विशेषतः 2025 साली अर्ज भरलेल्या अनेक नागरिकांनी वारंवार पाठपुरावा करूनही त्यांची नावे अंतिम यादीत समाविष्ट न झाल्याची तक्रार केली आहे.

नागरिकांच्या मते, घरकुल विभागातील काही अधिकारी व कर्मचारी मनमानी पद्धतीने काम करत असून ‘ओळख’ आणि ‘जवळीक’ पाहून लाभार्थ्यांची निवड केली जात आहे. परिणामी, खऱ्या गरजू आणि पात्र नागरिकांना योजनांपासून वंचित राहावे लागत आहे. काही नागरिकांनी असा आरोपही केला आहे की, लाभ मिळवण्यासाठी दलालांच्या माध्यमातून आर्थिक व्यवहार होत असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, अनेक अर्जदारांना त्यांच्या अर्जाची स्थिती काय आहे याची कोणतीही स्पष्ट माहिती दिली जात नाही. संबंधित कार्यालयात वारंवार फेऱ्या मारूनही अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. काही प्रकरणांमध्ये कागदपत्रे पूर्ण असूनही अर्ज प्रलंबित ठेवण्यात आल्याचे समोर आले आहे.

या सर्व प्रकारामुळे परळीतील घरकुल योजनेच्या अंमलबजावणीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. पारदर्शकतेचा अभाव, निवड प्रक्रियेत अनियमितता आणि प्रशासनाचा ढिसाळ कारभार यामुळे नागरिकांचा शासनावरील विश्वास डळमळीत होत असल्याचे चित्र आहे.

याप्रकरणी नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ लक्ष घालून 2024 ते 2026 या कालावधीत घरकुल विभागात झालेल्या कामकाजाची सखोल चौकशी करावी, अशी मागणी नगरसेवक कादर भाई कुरेशी यांनी केली आहे संबंधित दोषींवर कडक कारवाई करावी आणि पात्र लाभार्थ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी जोरदार मागणी केली आहे. तसेच, घरकुल योजनांची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक करण्यासाठी ऑनलाईन यादी जाहीर करावी आणि अर्जदारांना नियमित माहिती उपलब्ध करून द्यावी, अशीही मागणी पुढे येत आहे.

--------------------------------------

लोकशाही विचारांची पायाभरणी झाली, जिथे सर्व स्तरातील लोकांना आपले विचार मांडण्याचे स्वातंत्र्य होते.

स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठीही त्यांनी मोठे कार्य केले. त्या काळात स्त्रियांना शिक्षण व स्वातंत्र्य देण्याचा त्यांनी पुरस्कार केला. त्यांच्या विचारांमुळे समाजात परिवर्तनाची लाट निर्माण झाली आणि आजही त्यांच्या शिकवणीचे महत्त्व तितकेच अधोरेखित होते.

महात्मा बसवेश्वर यांचे विचार आणि कार्य आजच्या काळातही प्रेरणादायी असून, समताधिष्ठित आणि न्याय्य समाज निर्मितीसाठी त्यांचे योगदान अमूल्य आहे.

यावेळी शिरीष सलगरे, काशिनाथ सरवदे,कैलास रिकिबे,प्रवीण रोडे,अनंत कातकडे, संदीप चौधरी, परमेश्वर मुंडे ,देविदास मुंडे, राहुल व्हावळे, बालू कांदे,संतोष कांबळे, जयसिंग रोडे आदीसह मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

--------------------------------

अत्यंत गंभीर स्थितीत असतानाही संजय जाधव यांनी हल्लेखोरांच्या तावडीतून सुटका करून घेत जवळच असलेल्या एका शेतातील घराचा आधार घेतला. तेथून त्यांनी तातडीने पोलिसांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच सिरसाळा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जाधव यांना पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

या हल्ल्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट होऊ शकले नाही. मात्र, भररस्त्यात उपसभापतींच्या पतीवर झालेल्या या हल्ल्यामुळे राजकीय वर्तुळात आणि नागरिकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. पोलीस सध्या या प्रकरणाचा अधिक तपास करत असून हल्लेखोरांचा शोध घेतला जात आहे. दरम्यान, डॉ. संजय जाधव यांचा काही महिन्यांपूर्वी गावातीलच एका युवकाबरोबर वाद झाला होता. या युवकाला एका प्रकरणात समजावून सांगताना त्यांनी मारहाण केल्याचा व्हिडिओ त्यावेळी व्हायरल झाला होता. याचवेळी या युवकाने त्यांना ‘तुझे बघून घेतो, तुला सोडणार नाही’ अशी धमकी दिली होती अशी माहिती पुढे आली आहे.

या पूर्ववैमनस्यातूनच डॉ. संजय जाधव यांच्यावर हा प्राणघातक हल्ला झाला असावा असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. सध्या डॉ. संजय जाधव यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. याबाबत लवकरच पोलीस प्रक्रिया पूर्ण होऊन संजय जाधव यांच्या जवाबानंतर गुन्हा दाखल होईल व यातूनच या हल्ल्याचे कारण स्पष्ट होणार आहे.

---------------------------

उदरनिर्वाह करतात स्वच्छ प्रतिमा पारदर्शक कारभार असलेले ख्यातनाम श्री माधवजी निर्मळ माजलगाव मतदार संघा सह बीड जिल्ह्यमध्ये भाजपांच्या पदाधिकारी कार्यकर्ते यांना राजकिय ताकत देण्यासाठी व सर्वांना बरोबर घेऊन चालण्यासाठी श्री माधव निर्मळ यांना विधानपरिषदेवर आमदार किची संधी देणे गरजेचे आहे असे भाजपा कार्यकर्ते श्री केशवजी रुपणर बोलत होते श्री निर्मळ यांच्या पाठीमागे जनाधार मोठा असुन सर्वांच्या सुःख दुःखात सहभागी होणार श्री निर्मळ कुटुंब असल्याने त्यांना भाजपा कडून राजकिय बळ मिळणे गरजेचे आहे त्यांनी कोणत्याही पदाची अपेक्षा न करता भाजपा मध्ये मंत्री पंकजाताई यांच्या नेतृत्वाखाली प्रवेश केलेला आहे तेव्हा पासून गाव निहाय श्री माधव निर्मळ यांचे दौरे चालू असून भाजपाचे ध्येयधोरणे सरकारने केलेले जनसामान्यांचे कार्य शेवटच्या माणसा पर्यंत पोहचाऊन सांगत असल्यामुळे भाजपा पक्ष विस्तारा करिता श्री माधवजी निर्मळ यांच्या नेतृत्वाचा फायदा भाजपाला होताना दिसत आहे बीड जिल्हा परिषदेवर भाजपाचा झेंडा फडकविण्यासाठी आमदार किच्या माध्यमातुन श्री माधवजी निर्मळ यांना भाजपाने राजकिय बळ देणे गरजेचे आहे असे श्री केशवजी रुपणर बोलत होते

--------------------------------------

बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवण - चरित्रावर व्याख्यान होणार आहे त्यानंतर शोभेची देखणी दारु उडवली जाणार असून नंतर रात्री 9 : ते 12 : वाजेपर्यंत महाराष्ट्रातील प्रसिद्ध गायिका - कोमलताई पाटोळे यांच्या भिम - गितांचा कार्यक्रम होणार आहे या भिमजन्मोत्सव कार्यक्रमामध्ये 500 लोकांना खास स्नेहभोजन दिले जाणार आहे या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मा श्री लक्ष्मणजी हाके सर श्री देविदासजी वाघमोडे साहेब ( पोलिस निरीक्षक धारूर ) श्री ढाकणे साहेब ( पोलिस निरीक्षक दिंद्रुड ) यांची उपस्थिती लाभणार आहे तरी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त होणाऱ्या भोगलवाडी येथिल कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहुल कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन समस्त भोगलवाडी काटेवाडी काळ्याचीवाडी गावातील नागरीकांनी केलेले आहे

--------------------------------

तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार ही निवड करण्यात आल्याचेही पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. सदर पदाचा कार्यकाळ एक वर्षाचा असून, या कालावधीत ज्ञानोबा उर्फ माऊली फड यांनी शिवसेनेच्या हिंदुत्वाच्या विचारांचा प्रचार-प्रसार करावा आणि संघटन अधिक मजबूत करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

या नियुक्तीमुळे परळी तालुक्यातील शिवसेना संघटनात्मक कामाला अधिक गती मिळणार असल्याची प्रतिक्रिया पक्षाच्या कार्यकर्त्यांतून व्यक्त होत आहे.

ज्ञानोबा नरहरी फड यांची शिवसेनेच्या परळी तालुका समन्वित पदी निवड नुकतीच करण्यात आली आहे. या निवड होताच परळी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाके फोडून शिवरायांच्या अश्वारुढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आनंदोत्सव साजरा करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे महाराष्ट्र समन्वयक तथा भगवान सेनेचे सरसेनापती फुलचंद कराड, शिवसेनेचे तालुकाप्रमुख तथा नगरसेवक व्यंकटेश शिंदे, शहर प्रमुख वैजनाथ माने, अंबाजोगाई तालुकाप्रमुख अर्जुन भाऊ वाघमारे, भागवत नागरगोजे, भक्तरामजी कांदे, अरुण दराडे, सोनहिरा उपसरपंच गोविंद सुदाम मुंडे, रवी कराड, धरणीधर महाराज आघाव, संभाजी सोळंके, लहूदास रोडे, वैजनाथ कराड, भागवत नागरगोजे, संभाजी केंद्रे, गोटू कातखडे, निलेश कातखडे, विशाल डिघोळे, रघुनाथ चप्पे, महेश गवळी आदींची उपस्थिती होती.

हॅलो बीड

परळी संघर्षनेता

मंगळवार दि. 21 एप्रिल 2026






# संस्कारांच्या नंदनवनात यशाचा दरवळ: संस्कार प्राथमिक शाळेत लागला 'ॲडमिशन फुल'चा बोर्ड!

## नियोजनाचा 'दिपक' अन् यशाचा प्रकाश! 500 अर्जांमधून 250 चिमुकल्यांची निवड; दीपक तांदळे यांच्या दूरदृष्टीने रचला सुवर्ण इतिहास

परळी वैजनाथ (प्रतिनिधी):

शब्दांना जिथे कर्तृत्वाची धार मिळते आणि स्वप्नांना जिथे परिश्रमाचे पंख फुटतात, तिथे यशाची शिखरे कशी सर होतात, याचे जिवंत उदाहरण म्हणजे परळीतील संस्कार प्राथमिक शाळा! शैक्षणिक वर्ष 2026-27 चा श्रीगणेशा होण्यापूर्वीच इयत्ता पहिलीच्या प्रवेशाचा *प्रवेश पूर्ण (Housefull)* बोर्ड लागला असून, या यशाने परळीच्या शैक्षणिक क्षेत्रात पुन्हा एकदा नवा इतिहास रचला आहे. हा केवळ प्रवेशाचा टप्पा नसून, पालकांनी शाळेवर ठेवलेल्या दृढ विश्वासाचे प्रतीक मानले जात आहे.

संस्कार शाळेची ही उत्तुंग झेप म्हणजे संस्थेचे संस्थापक कैलासवासी विठ्ठलरावजी तांदळे साहेब यांच्या पवित्र स्मृती आणि आशीर्वादाची पुण्याई आहे. त्यांनी लावलेल्या या रोपट्याचा आज वटवृक्ष झाला असून, त्यांच्याच विचारांच्या प्रेरणेतून ही शाळा संस्कारांची शिदोरी वाटत आहे. दरवर्षीप्रमाणे *संस्कार प्री-एंट्रन्स टेस्ट*' द्वारे विद्यार्थ्यांची पारदर्शक निवड करण्यात आली.

यावर्षी शाळेची विश्वासार्हता इतकी वाढली आहे की, पद्मावती आणि विद्यानगर विभाग मिळून इयत्ता पहिलीसाठी तब्बल 500 पालकांनी नोंदणी केली होती. मात्र, गुणवत्तेशी तडजोड न करता, अत्यंत पारदर्शक अशा *'संस्कार प्री-एंट्रन्स टेस्ट'* द्वारे 250 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. ही परीक्षा केवळ प्रवेश प्रक्रिया नसून विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता, भाषिक कौशल्य, निरीक्षणशक्ती आणि सर्जनशीलता यांचा शोध घेणारा अभिनव उपक्रम ठरला. उर्वरित विद्यार्थ्यांना प्रवेश देता आला नाही, याबद्दल व्यवस्थापनाने खंत व्यक्त करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

या यशाचे खरे शिल्पकार मॅनेजमेंट गुरु तथा पद्मावती शिक्षण संस्थेचे सचिव श्री. दीपकजी तांदळे हे आहेत. संस्कार शाळा ही गुणात्मक शिक्षणाची पंढरी म्हणून ओळखली जाते. शाळेत राजस्थानचा 'ॲलन कोटा' पॅटर्न, अबॅकसची प्रगल्भता आणि 'केयान' (K-Yan) तंत्रज्ञानावर आधारित डिजिटल शिक्षण, या सर्व गोष्टी दीपक साहेबांच्या कल्पकतेतून साकारल्या आहेत. शाळेत केवळ पुस्तकी ज्ञान दिले जात नाही, तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी स्कॉलरशिप, ऑलिम्पियाड, MTS व श्रेया परीक्षांचे विशेष क्लासेस घेतले जातात. तसेच विद्यार्थ्यांमध्ये तलवारबाजी व लाठी-काठी यांसारख्या कौशल्यांचा विकास केला जातो. एकूणच कृतीयुक्त व आनंददायी शिक्षणावर भर दिला पान 3 वर

# जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त परळीत भव्य जन्मोत्सव व शोभायात्रा उत्साहात

## ➲ माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांची भेट; वीरभद्र पुरवंत संघाच्या चित्तथरारक, जोशपूर्ण नृत्य, पारंपारिक कलाकृतीने परळीकर मंत्रमुग्ध

### न्यू माणिक नगर वीरशैव लिंगायत समाज बांधव व कल्याणकारी हनुमान मंदिरचा उपक्रम





परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त न्यू माणिकनगर येथील वीरशैव लिंगायत समाज बांधव व कल्याणकारी हनुमान मंदिराच्या वतीने दि. 15 ते 19 एप्रिल दरम्यान विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवाची सांगता भव्य व पारंपरिक शोभायात्रेने मोठ्या उत्साहात करण्यात आली.

उत्सवादरम्यान दररोज सकाळी 'परमरहस्य' पारायण, दुपारी महाप्रसाद तसेच सायंकाळी 4 ते 6 या वेळेत विविध महिला भजनी मंडळांच्या भजनसेवा पार पडल्या. यात कल्याणकारी, इच्छापूर्ती, माणिकनगर, बसवेश्वर, जिव्हेश्वर, सेवाभावी शंभू महादेव, वैद्यनाथ, गुरुलिंगस्वामी, पान 3 वर

# ठोस आश्वासनाने रस्ते नुतनीकरण प्रश्न मिटला

## कार्यकारी अभियंता यांच्या आश्वासनाने आंदोलन तूर्तास स्थगित




परळी / प्रतिनिधी अंबाजोगाई - मोहा - सिरसाळा व परळी - नागापूर - बोधेगाव - मोहा - सर्फराजपूर या दोन रस्त्यांचे तात्काळ अद्यवतीकरण करा या मागणीसाठी भारताच्या लोकशाहीवादी युवक संघटना (डीवायएफआय) ने रखरखत्या उन्हात म्हतारगाव फाटा कान्नापूर या ठिकाणी मागील पाच दिवसापासून बेमुदत ठिय्या आंदोलन सुरु केले. या आंदोलनास पाठींबा म्हणून या खराब मार्गाने बाधित गावकऱ्यांनी टायर जाळून बांधकाम विभागाचा निषेध केला. आंदोलनाची तीव्रता पाहता विभागाचे कार्यकारी अभियंता स्वामी, उपअभियंता मुंडे यांनी सोमवार दि 20 रोजी आंदोलनकर्त्यांनी भेट घेतली. सुमारे दीड तास आश्वासक चर्चेअंती हे आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले.

परळी तालुक्यातील मोहा पान 3 वर

# परळी नगर परिषदेत घरकुल विभागात गोंधळ : कादर पाशा कुरेशी

## चौकशीची मागणी तीव्र



परळी आवास योजना 1.0 तसेच प्रधानमंत्री आवास घरकुल योजना 2.0 या दोन्ही योजनांमध्ये अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. या प्रकारामुळे शहरात एकच खळबळ उडाली असून लाभार्थ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नगर परिषदेच्या घरकुल विभागात मोठा गोंधळ निर्माण झाल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. प्रधानमंत्री पान 3 वर

# समता, मानवता आणि सामाजिक सुधारणा यांचा दीपस्तंभ महात्मा बसवेश्वर - अँड.मनोज संकाये

## ● अँड.मनोज संकाये मित्र मंडळाच्या वतीने जयंतीनिमित्त केले विनम्र अभिवादन



परळी वैजनाथ प्रतिनिधी समाजातील अन्याय, अंधश्रद्धा आणि विषमता दूर करण्यासाठी आयुष्यभर झटणारे महात्मा बसवेश्वर हे भारतीय समाजसुधारणेचे महान पुरस्कर्ते होते. त्यांनी समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश देत समाजाला नवदिशा दिली. त्यांच्या कार्यामुळे समाजात जागृती निर्माण होऊन सर्वसामान्यांना स्वाभिमानाने जगण्याचा मार्ग मिळाला असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये यांनी केले.

विद्यानगर येथील उद्यानातील महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी ते म्हणाले की,महात्मा बसवेश्वर यांनी "कायक वे कैलास" या तत्वज्ञानाद्वारे श्रमाला सर्वोच्च स्थान दिले. त्यांनी जातीभेद, लिंगभेद आणि सामाजिक अन्याय याविरुद्ध आवाज उठवून सर्वांना समानतेचा अधिकार मिळावा यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या 'अणुभव मंटप' या संकल्पनेतून पान 3 वर

# परळी कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापतींच्या पतीवर कोयत्याने हल्ला;

## परिसरात खळबळ



परळी वैजनाथ, परळी वैजनाथ कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापती सौ. जयश्री जाधव यांचे पती डॉ. संजय जाधव यांच्यावर सिरसाळा-गोवर्धन रोडवर रविवारी (19 एप्रिल) रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास पाच ते सहा अज्ञात इसमांनी कोयत्याने प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात जाधव गंभीर जखमी झाले असून, या घटनेमुळे सिरसाळा परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संजय जाधव हे रात्री 11:30 च्या दरम्यान गोवर्धनहून आपल्या शेतातून घराकडे आपल्या मोटरसायकलने येत होते. यावेळी शेताजवळ रस्त्यावर 5 ते 6 जणांनी त्यांचा पाठलाग करून त्यांना अडवले. काही समजण्याच्या आतच हल्लेखोरांनी त्यांच्यावर कोयत्याने थेट हल्ला चढवला. जाधव यांच्या डोक्यावर, मानेवर आणि हातावर कोयत्याने गंभीर वार करण्यात आले, तसेच रॉड आणि लाठ्या-काठ्यांनी बेदम मारहाण करण्यात आली.

पान 3 वर




# मंत्री पंकजाताई मुंडे यांनी विधानपरिषदेवर श्री माधवजी निर्मळ यांना काम करण्याची संधी द्यावी -

## श्री केशव रुपणर यांची भाजपा कडे मागणी





धारूर ( बाबुराव तिडके ) माजलगाव मतदार संघाचे भाजपाचे विधानसभा प्रमुख श्री माधव निर्मळ हे भाजपाच्या जडणघडणी मध्ये सक्षम नेतृत्व म्हणून पुढे येत आहेत मंत्री पंकजा मुंडे यांचे विश्वासु सहकारी म्हणून त्यांना ओळखले जाते उद्योग क्षेत्रामध्ये महाराष्ट्रामध्ये मोठे नाव असलेले निर्मळ कुटुंब त्यांच्या नर्मदा उद्योग समुहाच्या माध्यामातून अनेक कुटुंबे आपल्या परिवाराचा पान 3 वर

# विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या भिमजन्मोउत्सवा निमित्त भोगलवाडी येथे

## ● गायिका - कोमलताई पाटोळे यांच्या भिम - गितांच्या कार्यक्रमा सह अनेक कार्यक्रमांचे आयोजन






धारुर ( बाबुराव तिडके ) महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती या जगामध्ये 14 एप्रिल रोजी मोठ्या धुमधडाक्यामध्ये साजरी केली जाते त्याच धर्तिवर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेवर चालणाऱ्या धारूर तालुक्यातील भोगलवाडी येथे साजरी केली जाणार आहे दि 23 एप्रिल वार गुरुवार रोजी दुपारी ठिक 4 : वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणुक भोगलवाडी या नगरीमध्ये निघणार आहे मिरवणुकी नंतर ओ बी सी नेते मा श्री लक्ष्मणजी हाके सर यांचे डॉ पान 3 वर

# परळी तालुक्यात शिवसेनेची नवी नियुक्ती; तालुका समन्वयक पदाची ज्ञानोबा फड यांच्यावर जबाबदारी

## फुलचंद कराड यांच्या संपर्क कार्यालयात सत्कार





परळी, वैजनाथ ( प्रतिनिधी): शिवसेना पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी परळी तालुक्यात महत्त्वाची नियुक्ती करण्यात आली आहे. धर्मापुरी येथील ज्ञानोबा उर्फ (माऊली) नरहरी फड यांची शिवसेना पक्षाच्या परळी तालुका समन्वयक पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. सदरील निवडीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. दरम्यान फड यांची परळी तालुका समन्वयक पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार शिवसेनेचे शिंदे गट महाराष्ट्र समन्वयक तथा भगवान सेनेचे सरसेनापती फुलचंद कराड यांच्या संपर्क कार्यालयात सत्कार करण्यात आला.

ही नियुक्ती शिवसेनेचे बीड जिल्हा जिल्हाप्रमुख सचिन अर्जुनराव मुळूक यांनी 13 एप्रिल 2026 रोजी दिलेल्या नियुक्तीपत्राद्वारे जाहीर केली. या नियुक्तीला शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाची, तसेच धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रेरणेची जोड असल्याचे नमूद करण्यात आले आहे. पान 3 वर